॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकाऱ्यांसाठी 'एककाचे नियोजन व अंमलबजावणी' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा माजी प्राचार्य डॉ. अनिल राव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना राजेंद्र नन्नवरे यांनी पर्यावरण संवर्धन व जनजागृतीवर भर देत कुलपती मियावाकी घनवन प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन व जैवविविधतेच्या जतनासाठी राष्ट्रीय सेवा योजना एककांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन तसेच सातत्याने जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अनिल राव यांनी 'कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. सुदृढ कुटुंबव्यवस्था ही सुदृढ समाजाची पायाभरणी असून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. एस. टी. इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची व्यापकता स्पष्ट करताना ही योजना केवळ शिबिरे व औपचारिक उपक्रमांपुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. कार्यक्रमाधिकाऱ्यांनी स्थानिक सामाजिक प्रश्न समजून घेऊन विद्यार्थ्यांच्या सहभागातून सकारात्मक व शाश्वत उपाययोजना राबवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेत विद्यापीठाचे आर्थिक सल्लागार अभिषेक कोठारी यांनी वित्त व लेखापरीक्षण, नंदुरबार विभागीय समन्वयक दिनेश देवरे यांनी विविध कार्यक्रमांचे नियोजन, जळगाव जिल्हा समन्वयक प्रा. राजू गवारे यांनी ऑर्डीनस १६३ संदर्भात प्रश्नोत्तरांसह मार्गदर्शन, तर पारोळा विभागीय समन्वयक डॉ. प्रदीप अवजेकर यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजना एककांचे नियोजन, सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, लोकसहभाग, जनजागृती आणि उपक्रमांचे मूल्यमापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाधिकाऱ्यांनीही आपल्या अनुभवांसह विविध अडचणी व अपेक्षा मांडत चर्चेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. प्रवीण महाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अभिषेक शर्मा यांनी केले, तर आभार नंदुरबार जिल्हा समन्वयक प्रा. विशाल करपे यांनी मानले. कार्यशाळेस धुळे, जळगाव व नंदुरबार या तीनही जिल्ह्यांतील १४० पेक्षा अधिक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, महिला कार्यक्रमाधिकारी व सहाय्यक कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने काव्यगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कवी संतोष पावरा यांनी बहिणाबाईंच्या साहित्याचा, तसेच आदिवासी समाजाच्या बोलीभाषेतील कविता व लोकजीवनाचा परिचय करून देत काव्यगीतांचे सादरीकरण केले.

मार्गदर्शन करताना कवी संतोष पावरा म्हणाले की, "कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव विद्यापीठाला देणे हा कवितेचा सन्मान आहे." बहिणाबाईंच्या साहित्यामध्ये ग्रामीण जीवन, निसर्ग, मानवी संवेदना आणि जीवनाचे तत्त्वज्ञान यांचा सुंदर संगम आढळतो. केवळ पुस्तके वाचून चालत नाही, तर पुस्तकांसोबत माणसांचे चेहरे आणि निसर्गही वाचता आला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तसेच आदिवासी समाजातील पावरा आणि भिल्ल बोलीतील विविध कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. आदिवासी समाजाचे जीवन, संघर्ष, निसर्गाशी असलेले नाते आणि मातृभूमीविषयीची भावना या गीतांमधून प्रभावीपणे मांडण्यात आली.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. म. सु. पगारे यांनी कवयित्री बहिणाबाईंच्या साहित्यिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, "बहिणाबाईंनी कवितेच्या माध्यमातून विश्वामध्ये तत्त्वज्ञानाची पेरणी केली." त्यांच्या कवितांकडे केवळ साहित्य म्हणून न पाहता त्यातील जीवनानुभव, संवेदना आणि तत्त्वज्ञान समजून घेण्याची गरज आहे. प्रत्येकाला संवेदना आणि अनुभूतीच्या माध्यमातून महापुरुषांकडे पाहता आले पाहिजे तसेच त्यांच्या कार्याचा अनुभव घेता आला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खेमराज पाटील यांनी केले, तर कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्यासन केंद्राचे संचालक विजय आहेर यांनी प्रास्ताविक केले.

........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता